# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : बुधवार 02ऑक्टोबर 2013
**स्थळ** : 14 कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – 400 053

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री मंगेश मनोहर राणे | 5. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 2. श्री सुनिल सदानंद राणे | 6. श्री भरत गणपत राणे |
| 3. श्री मधुसुदन श्रीधर राणे | 7. श्री उदय भगवान राणे |
| 4. श्री जयवंत नाना राणे | 8. श्री रत्नाकर नाना राणे |

फळसेवाडी हितकारी संस्था यांची कमिटी सभा बुधवार दिनांक 02 ऑक्टोबर 2013 (महात्मा गांधी जयंती) या दिवशी, संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांच्या निवास स्थानी 14 कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – 400 053 येथे संपन्न झाली. संस्थेचे अध्यक्षांच्या उपस्थितीत जेष्ठ नागरीक 'सल्लागार' श्री मधुकर श्रीधर राणे यांना अध्यक्ष स्थान देण्यात आले.

प्रथम संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या (वाढदिवस 29 सप्टेंबर 201 रोजी) त्यानंतर चिटणीसांनी संस्थेची सभा बोलविण्याचे प्रयोजन सांगितले. रस्ता व पाणी या दोन टेंब वाडीच्या समस्या आहेत. त्या दृष्टीकोनातून गणपती उत्सवामध्ये टेंबावरील ग्रामस्थ गावी गेले असताना दरवर्षीप्रमाणे चर्चा झाली व या सभेस श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी फार मोठी मेहनत घेतली. श्री रत्नाकर नाना राणे यांना आपण या गावचे वाडीतील कायम रहिवाशीआहात तरी आपण याबाबतीत पुढाकार घ्या आपण आर्थिक पाठबळ उभे करु अशी ग्वाही दिली. त्या दृष्टीने रस्त्याची आखणी केली. तसेच त्यांच्या जमीन मालकांशी चर्चा केली व यातून मार्ग मिळताच गणपती दर्शनास आलेले श्री विरेन्द्र अनंत राणे यांनी लगेचच पैसे बंदोबस्त करतो असे सांगितले त्यानुसार श्री विरेंन्द्र अनंत राणे यांनी त्या संर्दभात मुंबईस आल्यावर रु.111,000/- (रुपये एक लाख अकरा हजार फक्त) चा बंदोबस्त केला.

या सभेस श्री रत्नाकर नाना राणे यांनी उत्कृष्ट मार्गदर्शन केले व या रस्त्याचे बांधकाम करून देण्याबाबत ठोस आश्वासन दिले. त्यानुसार रु.50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त) त्यांच्या वैयक्तिक खात्यामध्ये ट्रान्सफर करण्यास सर्वांनी परवानगी दिली व विहीरीसाठी दिलेले रु.20,000/- (रुपये वीस हजार फक्त) व रु.50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त) ची रिसीट देण्यास विनंती करण्यात आली. या बाबतीत श्री भरत गणपत राणे हे गावच्या मिटींगमध्ये नसल्यामुळे त्यांनी विचारलेल्या प्रश्नास सर्मपक उत्तरे दिली. या सभेस श्री जयवंत नाना राणे, श्री शंकर बाळकृष्ण राणे, श्री मधुसुदन श्रीधर राणे यांनी भाग घेतला.

संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांनी संबोधन केले की वाडीतील शाळा कै सखाराम आबाजी राणे (अण्णा राव) यांच्या प्रेरणेतून निर्माण झाली व त्यामुळे पुढील पिढी शिकली. त्यांच्याच वंशातून आलेले श्री विरेंन्द अनंत राणे या रस्त्याबद्दल आस्था दाखवितात हे कौतुकास्पद आहे. त्या दृष्टीकोनातून ह्या रस्त्याचे उद्घाटन दिनांक 08 नोव्हेंबर

2013 रोजी श्री गोट्या सावंत यांच्या हस्ते व इतर मान्यवारांच्या उपस्थितीत करण्याचे ठरले. एकंदर ही सभा महत्वपूर्ण ठरली.

संक्षिप्त ठराव मान्यता -
संस्थेच्या वतीने रस्त्याच्या विकासासाठी रु.50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त) श्री रत्नाकर नाना राणे यांच्या खात्यामध्ये ट्रान्सफर करणे असा निर्णय झाला. ही रक्कम आगाऊ देण्याचे ठरले.

1. रु.111,000/- (रुपये एक लाख अकरा हजार फक्त) आभार प्रदर्शन
   (श्री जयसुख भाई पटेल NKGSB धनादेश क्र 128353 रु.61,000/-, ICICI Bank धनादेश क्र 608031 रु.50,000/- एकूण रु111,000/-)
2. रु.111,000/- (रुपये एक लाख अकरा हजार फक्त) संस्थेच्या खात्यामध्ये घेण्यास मंजूरी
3. संस्थेकडे आलेला हा पैसा कामाचा निधी असल्यामुळे रु.50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त) श्री रत्नाकर नाना राणे यांच्या खात्यामध्ये ट्रान्सफर करण्यास मंजूरी
4. रिसीट देणे
5. हा रस्ता श्री रत्नाकर नाना राणे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण होणार

या सभेसाठी बैठकीची व चहापाण्याची व्यवस्था श्री मंगेश मनोहर राणे उभयतांनी केली त्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानण्यात आले व ही सभा रात्री 8.15 वाजता संपली.

---